जा.क्र.वि.शा./राजकीय विभाग/ ५१८७ /२०२३
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :-१६ /०५/२०२३

**विषय :- मतदान केंद्राचे १०० मीटर चे परिक्षेत्रातील व्यावसायीक दुकाने व आस्थापना बंद ठेवणे बाबत फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.१/का-८ दि.०६/०४/२०२३ च्या आदेशान्वये **निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य/थेट सरपंचाच्या** रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवणुकीसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर झालेला आहे. आचारसंहीता दिनांक १८/०४/२०२३ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. दिनांक १८/०५/२०२३ रोजी मतदान व दिनांक १९/०५/२०२३ रोजी मतमोजणी होणार आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीतील

१) **मांजरी खुर्द ग्रामपंचायतीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांजरी खुर्द ता. हवेली जि. पुणे बुथ क्र १ व बुथ क्र २**
२) **भावडी ग्रामपंचायतीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भावडी ता. हवेली जि. पुणे**
३) **बकोरी ग्रामपंचायतीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बकोरी ता. हवेली जि. पुणे** या मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.

सदरचे मतदान सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सदर मतदान केंद्राचे परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसराच्या जागेचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी संदिप कर्णिक, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीतील **मांजरी खुर्द ग्रामपंचायतीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांजरी खुर्द ता. हवेली जि. पुणे बुथ क्र १ व बुथ क्र २, भावडी ग्रामपंचायतीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भावडी ता. हवेली जि. पुणे, बकोरी ग्रामपंचायतीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बकोरी ता. हवेली जि. पुणे** च्या १०० मीटर परिसरात दि.१८/०५/२०२३ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

मतदान केंद्राचे (इमारतीचे) १०० मीटर परिसराचे आतील सर्व व्यावसायीक दुकाने, रेस्टॉरंट, टपऱ्या, (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवावेत. सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.१६ /०५/२०२३ रोजी दिला आहे.

(संदिप कर्णिक)
**पोलीस सह आयुक्त,**
**पुणे शहर.**

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :-१६ /०५/२०२३**